# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3516 /शि.वि./2017
दि. 11/01/2017

प्रति,

1) मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, सर्व म.न.पा.,शाळा
2) देयक लिपीक, झोन क्र. 1 ते 10/माध्यमिक शाळा
3) शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10

**विषय :– म.न.पा. झोन कार्यालय/शाळामध्ये डिजीटल संसाधन/साहित्याचा वापर करण्याबाबत.**

**संदर्भ :– कार्यालयीन पत्र क्र.3498/शि.वि./2017 दि.10.01.2017**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, डिजीटल इंडीया योजने अंतर्गत म.न.पा. कार्यालय, शाळामध्ये जास्तीत जास्त डिजीटल संसाधन/साहित्याचा वापर करावयाचा आहे. या अंतर्गत म.न.पा.तील सर्व म.न.पा. झोन कार्यालय/शाळामधील देयक लिपीक, मुख्याध्यापक व शाळा निरीक्षक यांना डिजीटल संसाधन जसे स्मार्ट फोन, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, प्रोजेक्टर यांचा वापर करणे. बायोमॅट्रीक मशिन /सी.सी.टि.व्ही. कॅमेरे यांचा वापर व निगा राखणे, नेटचा वापर करणे याकरीता श्री.विनय बगले, आय.टी.समन्वयक झोन कार्यालयात प्रशिक्षण देणार आहे. आपणांस काही अडचण आल्यास त्या सोडविण्याकरीता श्री.विनय बगले हे आठवडयातील तीन दिवस सोमवार, मंगळवार व बुधवारला झोन कार्यालयात खालीलप्रमाणे पूर्ण वेळ उपस्थित राहणार आहेत. तसेच शाळेत काही तांत्रिक अडचण आल्यास प्रत्यक्ष शाळेला भेट देवून ती दूर करतील व आय.एस.ओ. झालेल्या शाळांतील समस्या सोडवतील.

| अ.क्र. | झोन क्र. | उपस्थितीचा दिवस |
|---|---|---|
| 1 | लक्ष्मीनगर झोन क्र.1 | पहिला सोमवार |
| 2 | धरमपेठ झोन क्र. 2 | पहिला मंगळवार |
| 3 | हनुमाननगर झोनक्र.3 | पहिला बुधवार |
| 4 | धंतोली झोन क्र.4 | दुसरा सोमवार |
| 5 | नेहरूनगर झोन क्र.5 | दुसरा मंगळवार |
| 6 | गांधीबाग झोन क्र.6 | दुसरा बुधवार |
| 7 | सतरंजीपूरा झोन क्र.7 | तिसरा सोमवार |
| 8 | लकडगंज झोन क्र.8 | तिसरा मंगळवार |
| 9 | आसीनगर झोन क्र. 9 | तिसरा बुधवार |
| 10 | मंगळवारी झोन क्र.10 | चौथा सोमवार |

तरी उपरोक्त वेळापत्रकानुसार झोनमधील देयक लिपीक, मुख्याध्यापक व शाळा निरीक्षक यांनी काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या सोडवून घ्याव्यात.

प्राथमिक शाळेचे सर्व देयक लिपीक झोनमध्ये बसून संगणक व नेटचा वापर करून आपले कार्यालयीन काम पार पाडतील. तसेच झोनमधील शाळांना संगणकीय कार्य करण्यास मदत करतील.

माध्यमिक शाळेतील सर्व देयक लिपीक शाळेसंबंधी सर्व कार्य त्यांचे शाळेत बसून पार पाडतील व शाळेच्या मुख्याध्यापकांना सर्व कार्यात मदत करतील.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.उपायुक्त–1., म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
2) सहा.आयुक्त, झोन क्र. 1 ते 10, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव सादर.
3) श्री.विनय बगले, आय.टी.समन्वयक, यांना कार्यवाहीस्तव